**सन २००८ च्या टंचाई कालावधीत जामनेर शहरात (जि.जळगाव ) निर्माण झालेल्या पिण्याच्या पाणी टंचाई निवारणार्थ तातडीच्या पाणी पुरवठा योजनेच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता (सुधारित)**

# महाराष्ट्र शासन

**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग**

शासन निर्णय क्र. टंचाई-२२०८/प्र.क्र.१३३/पापु १४

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

**दिनांक :- १८ ऑगस्ट, २००८**

**संदर्भ :-** १) शासन निर्णय पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. टंचाई-२०९९ / प्र.क्र.१४ / पापु-१४, दि. २ फेब्रुवारी १९९९

२) विभागीय आयुक्त, नाशिक यांचे पत्र क्र. नपा /२/१/ प्र.क्र.४२६३९ / जा.क्र.२५९७६/२००८, दि. २४ जुलै, २००८.

३) शासन निर्णय,पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.टंचाई -२२०८/प्र.क्र.१३३/पापु १४ दि.१६ ऑगस्ट,२००८

**प्रस्तावना :-**

सन- २००८ च्या टंचाई कालावधीत जळगाव जिल्हयातील जामनेर शहरात निर्माण झालेल्या पिण्याच्या पाणी टंचाई निवारणार्थ विभागीय आयुक्त, नाशिक यांनी संदर्भ क्र. २ अन्वये वाघुर धरणातील हिंगणे शिवारातील उद्‌भवाच्या ठिकाणापासून १२ कि.मी. PVC पाईप वापरुन पाईपलाईन टाकून धरणातील पाणी जामनेर येथील मेन जॅकवेलपर्यंत आणण्याचा रु. १,५९,३६,५६९/- किंमतीचा तातडीच्या पाणी पुरवठा योजनेचा प्रस्ताव विहित आर्थिक निकषात बसत नसल्याने विशेष बाब म्हणून शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला होता. सचिव स्तरीय स्थायी समितीच्या दि. २८ जुलै, २००८ रोजी झालेल्या बैठकीत सदर प्रस्ताव विचारात घेण्यात आला. सादर केलेल्या प्रस्तावातील रु. १,०३,३६,५६९/- किंमतीच्या PVC पाईप ऐवजी प्रदीर्घ कालावधीसाठी टिकणारे HDPE पाईप वापरावेत व त्याअनुषंगाने सुधारित अंदाजपत्रकास सादर करावे, असे सुचविण्यात आले होते. त्यानुसार जामनेर नगर परिषदेने रु. ७,८४,१५,७०३/- इतक्या किंमतीचे सुधारित अंदाजपत्रक सादर केले आहे. मूळ प्रस्तावातील रु. १,०३,३६,५६९/- किंमतीच्या PVC पाईप्सच्या ऐवजी सुधारित अंदाजपत्रकातील १६० मी.मी. व्यासाची १६ कि.ग्रॅम HDPE पाईप्सची रु.२,६५,५५,८५४/- किंमत विचारात घेऊन,सुधारित रु. ३,२१,५५,८५४/- किंमतीच्या तातडीच्या पाणी पुरवठा योजनेस मंजूरी देण्याचा शासन निर्णय संदर्भ क्र.३ अन्वये निर्गमित करण्यात आला होता. सदर संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णय रद्द करुन सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

प्रस्तावनेत नमूद केल्यानुसार **सदर संदर्भ क्र.३ येथील शासन निर्णय रद्द करुन पुढीलप्रमाणे सुधारित शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.**

सन- २००८ च्या टंचाई कालावधीत जळगाव जिल्हयातील जामनेर शहरात निर्माण झालेल्या पिण्याच्या पाणी टंचाई निवारणार्थ वाघुर धरणातील खादगाव शिवारातील उद्‌भवाच्या ठिकाणपासून **१६० मी.मी. व्यासाची १६ कि.ग्रॅम दाबाची ९६७० मीटर** लांबीची **HDPE** पाईपलाईन (PE 63) टाकून धरणातील पाणी जामनेर येथील सोनबर्डी पाण्याच्या टाकीपर्यंत आणण्याच्या **रु.३,२१,५५,८५४/- (रुपये- तीन कोटी, एकवीस लक्ष, पंचावन्न हजार, आठशे चोपन्न फक्त)** किंमतीच्या कामांना खालील अटींच्या अधीन राहून या आदेशान्वये एक विशेष बाब म्हणून तातडीच्या पाणी पुरवठा योजनेअंतर्गत प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

**अ)** वरील प्रमाणे मान्यता दिलेल्या रु. ३२१.५६ लक्ष किंमतीच्या **खर्चाच्या ९० टक्के म्हणजेच रु. २८९.४० लक्ष इतके अनुदान शासनाकडून उपलब्ध करून देण्यात येईल. उर्वरित १० टक्के**

**म्हणजेच रु. ३२.१६ लक्ष इतकी रक्कम जामनेर नगरपालिकेने लोकवर्गणीच्या रुपाने स्वतःच्या निधीतून भरावी.**

**ब) योजनेचे अंदाजपत्रक व संकल्पन तपासून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सक्षम अधिकाऱ्यांकडून तांत्रिक मान्यता घेण्याची कार्यवाही जामनेर नगरपालिकेने तात्काळ करावी व त्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करावी.**

**क) वरील सर्व कामे जामनेर नगरपालिकेने कोणत्याही परिस्थितीत दि. ३० सप्टेंबर, २००८ पर्यंत पूर्ण करुन पाणी पुरवठा सुरु करावा.**

**ड)** तातडीच्या योजनेचा कायमस्वरुपी वापर होण्याच्या दृष्टीने योजनेचे पाईप जमिनीत तीन फूट खोल टाकण्यात यावेत.

**इ)** जामनेर शहरासाठी याच उद्‌भवावर UIDSSMT मधून कायमस्वरुपी योजना घेताना ती या योजनेला पूरक योजना म्हणून घेण्यात यावी. UIDSSMT अंतर्गत योजनेसाठी योजनेच्या किंमतीच्या ८०:१०:१० (केंद्र शासन : राज्यशासन : नगरपालिका ) या गुणोत्तरामध्ये १० टक्के राज्यशासनाचा भाग म्हणून ही मंजूर केलेली तातडीच्या पाणी पुरवठा योजना विचारात घेण्यात यावी व त्यानंतर UIDSSMT च्या राज्यशासनाच्या वाटयासाठी वेगळयाने निधी मंजूर करण्यात येणार नाही.

**ई)** या योजनेच्या देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापनाची जबाबदारी जामनेर नगरपरिषदेची राहील.

**२.** या योजनेसाठी अनुदान मुक्ततेचे आदेश स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

**३.** हा शासन निर्णय, दि.२७ नोव्हेंबर २००२ च्या शासन निर्णय क्र. टंचाई-२००२/प्र.क्र.३४५/ पापु-१४ अन्वये पिण्याच्या पाण्याच्या टंचाई निवारणार्थ नागरी व ग्रामीण क्षेत्रातील विहित आर्थिक व भौतिक निकषाबाहेरील तातडीच्या पाणी पुरवठा योजनांना /उपाययोजनांना प्रशासकीय मंजूरी देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या सचिव स्तरीय स्थायी समितीच्या दि.२८ जुलै, २००८ रोजी झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

**४.** सदर शासन निर्णय शासनाच्या w.w.w.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक क्रमांक-२००८०८१८१७२१२४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,



**( ज. बा. कुलकर्णी )**
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन.

**प्रत,**

१. महालेखाकार, (लेखा व परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई.
२. महालेखाकार, (लेखा व परिक्षा /लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-२, नागपूर.
३. प्रधान सचिव (व्यय), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. प्रधान सचिव (२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
५. प्रधान सचिव, (म.व पु.) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. सचिव (ग्रा.वि.), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
८. विभागीय आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक.
९. जिल्हाधिकारी, जळगांव.
१०. मुख्याधिकारी, जामनेर नगरपालिका, जिल्हा- जळगांव.
११. जिल्हा कोषागार अधिकारी, जळगांव.
१२. जिल्हा पाणी पुरवठा अधिकारी तथा अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जळगांव.
१३. पापु-१४ संग्रहासाठी.